ज्या अर्थी संदर्भ क्र.६ अन्वये श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळणी ता.सिल्लोड यांनी दि.०२/१२/२०१४, रोजीच्या सुनावणी वेळी लेखी म्हणणे सादर करणे साठी वेळ देणे बाबत विनंती केली. त्यामळे पुढील सुनावणी दिनांक २२/१२/२०१४ ठेवण्यात आली. अर्जदार श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळण यांनी दिनांक २२/१२/२०१४ च्या सुनावणीच्या वेळी खालील प्रमाणे लेखी म्हणणे सादर केले की, मी तळणी येथील रहिवासी असून व्यवसायाने शेती करीत आहे. विठ्ठल सखाराम भोपळे हे माझे वडील होते. मला बहिणीच्या लग्नासाठी पैशाची आवश्यकता असल्याने मी गावातील सावकार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांच्या कडुन सन २००२ मध्ये रू.५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार रूपये) दरमहा दरशेकडा १०% दराने व्याजाने घेतले होते. या रकमेस धर म्हणून मी माझे नावावर असलेली तळणी शिवारातील गट नं.३५३ मधील १ हे. ६० जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर दोन साक्षीदारा समक्ष खरेदीखत क्र. ३०८९ दिनांक १२/७/२००२ नुसार त्यांच्या नावाने लिहुन दिलेली होती. तदनंतर मला वडिलाच्या डोळयाच्या दुखण्यासाठी पुन्हा त्यांच्याकडुन रु. ३००००/- अक्षरी तिस हजार मात्र १०% दराने व्याजाने घेतलेले होते. हया रकमेस धर म्हणुन मी माझ्या वडिलांच्या नावावर असलेली गट नं. ३५३ मधील १ हे.७५ आर व माझे नावावर असलेली १५ आर शेतजमिन सावकार यांच्या पत्नीच्या सौ. छायाबाई लक्ष्मण विसपुते यांच्या नावाने दिनांक ३/१०/२००३ रोजी खरेदीखत क्र. ३६९५ व ३६९६ नुसार लिहुन दिलेली होती. दोन्ही शेतजमिनी सावकारी व्यवहारातुन त्यांच्या नावाने लिहुन दिलेल्या असल्या तरी त्या परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर लिहुन दिलेल्या आहे. जमिनीच्या रजिस्ट्रीवर जि किंमत टाकलेली होती ती शासन दरानुसार टाकलेली होती. आमचा व्यवहार हा सावकारी व्यवहार होता. जमिन त्यांना विक्री केलेली नव्हती जमिन परत पलटवुन देणे बाबत दोन साक्षीदारा समक्ष तोंडी बोली झालेली आहे. सदरचे साक्षीदार हे धनसिंग शितलसिंग बेडवाल व बाबुलाल फुलसिंग गोठवाल रा.चारनेरवाडी हे आहे.सावकारी व्यवहार असल्याने ,जमिन तेव्हा पासुन माझ्याच ताब्यात होती. आजही त्यापैकी ४ एकर जमिन माझ्या ताब्यात आहे.आता पर्यंत मी त्यांना रु. १००,०००/- अक्षरी रुपये एक लाख मात्र परत केलेआहे.माझे कडुन व्याज फिटत नसल्याने पैशाचे व्याज म्हणुन उर्वरित ५ एकर जमिन मी त्यांना तात्पुरती कसण्यास दिलेली आहे. सदरची ५ एकर जमिन त्यांनी सौ. रेखाबाई कैलास भोपळे,प्रभाकर भगवंतराव ठोंबरे व मिराबाई कपुरचंद भोपळे सर्व रा.तळणी यांना परस्पर विक्री केलेली आहे. उवरींत जमिन मी आजही कसत आहे. त्यावर मी नियमित पणे पिक घेत आहे. आतापर्यंत या व्यवहारात त्यांना १००,०००/-अक्षरी रुपये एक लाख मात्र परत केले आहे. असे असतांना सुध्दा ते भरमसाठ व्याज दाखवुन जमिन विकण्याची धमकी देत आहे. घेतलेल्या मुद्दल रकमाची व्याजासह परत फेड झालेली असल्याने मी त्यांना त्यांचे नांवे लिहुन दिलेली शेतजमिन परत माझ्या नावाने पलटवुन देणे बाबत वेळोवळी विनंती केली केली असता त्यांनी सदरची जमिन आज आज उद्या उद्या नावाने करुन देतो. असे सांगुन जमिन परत नावावर करुन देण्यास टाळाटाळ केली आहे. ते आणखी रकमेची मागणी करीत आहे. ती रक्कम न दिल्यास जमिन विक्री करुन टाकेल अशी धमकी देत आहे. तदनंतर त्यांनी मला जमिन विक्री करण्याची धमकी दिलेली असल्याने श्री. नंदु कचरु दिवटे व इतर पिडीत तक्रारदार यांनी त्यांचे विरोधात अवैध सावकारी बाबत समाजीक कार्यकर्ते कल्याण सोपानराव सोनवणे यांच्या मार्फत तक्रार दिलेली होती. त्यानुसार या तक्रारीची चौकशी सहाय्यक निबंधक कार्यालयातील श्री. जैस्वाल यांनी केलेली आहे.तक्रारीच्या चौकशीच्या वेळी मी माझी तक्रार दिली असुन त्या बाबतचा सविस्तर जवाब चौकशी अधिकारी यांच्याकडे सादर केलेला आहे.तक्रारीनुसार नुसार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे घरी श्री.जैस्वाल यांनी घेतलेल्या घरझडतीत माझे व्यवहारा बावत शेतजमिनीची रजीस्ट्री व काही नोंद वहया सापडलेल्या आहे.त्यामध्ये मी व्याजाने घेतलेल्या रक्कमेची नोंद आहे.तसेच या पुर्वी

मी श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांच्याकडुन सन २००३ मध्ये रु.२००००/- अक्षरी रुपये विस हजार व्याजाने घेतलेले होते. ही रक्कम भावाच्या लग्नासाठी घेतलेली होती.त्या बदल्यास पैशास धर म्हणुन वडीलांचे नावावर असलेली गट नं.३४१ मधील ८० आर शेतजमिन त्याच्याकडे खरेदीखत म्हणुन करुन दिलेली होती. रकमेची मुद्यल व्याज मिळुन परत फेड झालेली असल्याने हि शेतजमिन त्यांनी खरेदीखत क्र.२१३२/दिनांक २६/४/२००५ नुसार माझ्या भाऊजाईच्या नावावर करुन दिलेली आहे. सदर सावकार श्री.लक्ष्मण भिका विसपुते हे व्याजाने पैसे देण्याचा धंदा करतात व त्याबदल्यात ते शेतक-यांच्या को-या चेकवर सहया घेतात व जमिनी त्यांच्या नावाने करुन घेतात व जमिन विकण्याची धमकी देतात.त्यांनी धावडा, तळणी, शिंन्देंफळ, आमाठाणा, लिहा, पारध, चारनेरवाडी व उपळीवाडी येथिल लोकांशी सावकारी व्यवहार केला आहे.तसेच ब-याच लोकांना त्यांनी घेतलेल्या रक्कमेची मुद्यल व व्याजासह रक्कमेची परतफेड झाल्यावर शेतजमिनी पलटवुन दिलेल्या आहेत. म्हणुन सदर चे वरील नमुद खरेदी खत रद्य करुन गहाण खत जाहिर करुन मला माझी जमिन परत करावी अशी मागणी केली आहे.

तसेच अर्जदार यांनी दिनांक २२/१२/२०१४, चे सुनावणी दरम्यान तोंडी म्हणणे वरील प्रमाणेच कथन केले आहे. यावर गैरअर्जदार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी असे निवेदन केले की, ८० आर जमिन ही श्री. विठ्ठल भोपळे यांनी मला कायम स्वरुपी विकली होती. त्यानंतर ४ वर्ष मी पेरली काही कालांतराने सदर जमिन दुस-यास न विकता मळयाची जमिन त्यांनाच विकली तिच्या बदल्यामध्ये ४ एकर ३० गुठे जमिन मी त्यांच्याकडुन विकत घेतली.त्यातुन आता सद्या ३ एकर २९ गुठे माझ्याकडे आहे. त्यावर माझा ताबा आहे.घरझडतीमध्ये माझ्या घरात त्या जमिनीची रजिस्ट्री सापडली त्यानंतर त्यांना श्री.आ.साहेबाकडुन तक्रारी नोटीस देण्यात येऊन तक्रार मांडली ही जमिन घेण्यास १२ वर्षा पुर्वी घेतलेली आहे. यामध्ये सावकारीचा काही प्रश्न नाही ही तक्रारी नोटीशीमध्ये खोटा अरोप आहे.आजही जमिन माझ्या ताब्यात आहे.म्हणुन मी माझ्या पत्नीच्या नावांवर असलेली जमिन श्री.पदमसिंग शिवलाल भोपळे यांना विक्री केली आहे. यात माझे कोणतेही खोटे म्हणने नाही. कोणताही सावकारी व्यवहार नाही रोख रक्कम देऊन खरेदीखत केले आहे. खरेदीच्या वेळेस कोणतीही तक्रार नव्हती. घर झडती नोटीस गेल्यावर खोटी तक्रार मांडली. यावर अर्जदार यांनी असे नमुद केले की,४ एकर जमिनीवर वडीलोपार्जीत माझाच ताबा आहे. त्याबाबत तलाठी सजा शिंदेफळ यांनी पंचनामा करुन स्थळपाहणी केली आहे. यावर गैरअर्जदार यांनी असे सांगितले की, घेतल्या तारखेपासुन आजपर्यंत सदर जमिन माझ्याच ताब्यात आहे. पंचनामा खोटा असुन बनावटी आहे.

DY. REGISTRAR AURANGABAD
सत्यमेव जयते

त्या नंतर अर्जदार श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे दिनांक ३१/१२/२०१४ रोजीच्या सुनावणीस तोंडी म्हणणे मांडले की, त्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे कडुन सन २००२ मध्ये रु.५००००/-शेकडा १०% दराने आणि रु.३००००/- शेकडा १०% दराने घेतले होते. त्या बदल्यात पैशास धर म्हणुन तळणी शिवारातील गट.नं.३५३ मधील १ हे.६० आर जमिन व गट नं.३५३ मधील १ हे.७५ आर व १५ आर जमिन श्री. लक्ष्मण भिका विसपुते व त्यांची पत्नी श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते यांच्या नावाने करुन दिली होती. त्या बाबत आजपर्यंत रु.१ लक्ष (१००,०००) परत फेड केलेले आहे. असे असतांना या जमिनीपैकी त्यांनी (विसपुते यांनी) परस्पर सौ. रेखाबाई कैलास भोपळे यांना ८० आर,श्री.प्रभाकर भगवंतराव ठोंबरे यांना ८० आर व सौ. मिराबाई कपुरचंद भोपळे यांना ४१ आर जमिन विक्री केली आहे. व लक्ष्मण भिका विसपुते (सावकार) यांच्यावर सावकारी गुन्हा दाखल झाल्यानंतर ही त्यांनी १ हे.४९ आर जमिन परस्पर श्री. पदमसिंग शिवलाल भोपळे यांना दिनांक १०/११/२०१४ रोजी विक्री केली आहे. तसेच या व्यवहारातील एक साक्षीदार श्री. धनसिंग शितल बेडवाल हे मयत झालेले आहे. त्या बाबतचे मुत्यु प्रमाणपत्र सादर केले आहे व जमिनीच्या ताब्या बाबत तहसिलदार यांचे १५/९/२०१४ चे अहवाल सादर केला आहे.

श्रीमती रेखाबाई कैलास भोपळे यांनी समक्ष सुनावणी वेळी सांगितले की, त्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेडुन ८० आर शेतजमिन विकत घेतली आहे.या व्यवहारात अडचन आहे. याबाबतची माहिती आम्हाला नव्हती. सदर जमिन आमच्या ताब्यात ८ वर्षापासुन आहे. आणि यावर्षी आम्ही त्यात अद्रक पेरली आहे.

श्री. प्रभाकर भगवंतराव ठोंबरे यांनी समक्ष सुनावणी वेळी सांगितले की,त्यांनी लक्ष्मण भिका विसपुते यांचे कडुन ८० आर जमिन सन २००२ मध्ये खरेदी केली त्यावेळी जमिनीचा ७/१२ श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांच्या नावाने असल्यामुळे जमिन खरेदी केली आहे. आणि सदर जमिन आज रोजी माझ्या ताब्यात आहे. श्री. लक्ष्मण भिका विसपुते व नंदलाल विठ्ठल यांच्या व्यवहाराबाबत त्यांना माहिती नाही.

श्रीमती मीराबाई कपुरचंद भोपळे यांनी सुनावणी वेळी सांगितले की,त्यांनी श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते यांच्याकडुन ४१ आर जमिन २००४ मध्ये खरेदी केली.सदर जमिनी बाबत सावकारी व्यवहार होता हे माहित होते. तथापी

जमिनीचा ७/१२ सौ. छायाबाइ लक्ष्मण विसपुते यांच्या नावाने असल्याने सदर जमिन खरेदी केलेली आहे.आज रोजी जमिनीचे ताबा माझा असुन कपाशी व अद्रक पिकाची लागवड केली आहे.

श्री.पदमसिंग शिवलाल भोपळे यांनी सुनावणी वेळी समक्ष सांगितले की,त्यांनी श्रीमती छायाबाइ लक्ष्मण विसपुते यांच कडुन १ हे.४९ आर शेतजमिन दिनांक १०/११/२०१४ रोजी खरेदी केली आहे. मी विसपुते यांचा शेजारी असुन सदर जमिन त्यांच्या कडुन विकत घेतली आहे. श्रीमती छायाबाइ विसपुते यांनी सांगितले की, त्यांच्यावर संकट आल्यामुळे जमिन विकणे आहे.ती घेता का? त्यामुळे ७/१२ पाहुन सदर जमिन मी विकत घेतली आहे. त्यावेळी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांच्या रहात्या घरी घर झडती झाल्याबाबत ऐकुन होतो मला नक्की माहित नाही कशाबाबत धाड होती. सदर खरेदी खतावरील आसलेला साक्षीदार श्री. सागर पदमसिंग भोपळे यांनी समक्ष जबाब नोंदविला की, सदर जमिन श्रीमती छायाबाइ लख्मण विसपुते यांची होती व त्याच्या स्वतःच्या आर्थिक अडचणी साठी ही जमिन विक्रीस काढली. ती जमिन श्री.पदमसिंग भोपळे यांनी खरेदी केली त्या व्यवहारास मी साक्षीदार आहे.

यांनंतर श्री.पदमसिंग भोपळे यांनी सागिंतले की,सदर जमिन (१ हे.४९ आर) ५,८३०००/-अक्षरी (पाच लाख त्र्यैंशी हजार रुपये केवळ) देऊन खरेदी केली आहे. ही रक्कम सै.छायाबाई लक्ष्मण विसपुते यांना श्री.शरद लक्ष्मण विसपुते व श्री.सागर पदमसिंग भोपळे यांचे समक्ष दिली.

यानंतर श्री.लक्ष्मण भिका विसपुते गैरअर्जदार यांनी सागिंतले की,श्रीमती मीराबाई कपुरचंद भोपळे यांना ८० आर जमिन विकली ७ वर्षापुर्वी सावकारीचा काही एक सवाल नाही. अर्जदार खोटं सांगतात त्यानंतर सदर जमिन मी नंदलाल विठ्ठल भोपळे कडुन शेतजमिन मी खरेदी करुन घेतली आहे. १२ वर्षा पुर्वीच्या शासकीय दराने रक्कम घेतली रक्कम आठवत नाही ते बळजबरी सावकारी व्यवहार म्हणत आहे. श्री. प्रभाकर ठोबरे यांना ८० आर जमिन विक्री केली असुन या व्यवहाराला १२ वर्षे झाले आहे. या मुळे हा व्यवहार सावकारीचा नाही. शासकीय दराप्रमाणे जमिन विकली आहे. हि जमिन नंदलाल भोपळे यांचेकडुन शासकीय दराने विकत घेतली होती खरेदी किंमत लक्षात नाही. माझ्यावर सावकारीचा खोटा आरोप केलेले आहे. पुढे त्यांनी म्हणने माडले की, ८ एकर ३० गुठे जमिनी पैकी ४ एकर स्वतःच्या नावे व पावने पाच एकर पत्नीच्या नावाने घेतली होती या व्यवहाराला १४ वर्षे झालेले आहे काहीला १२ वर्षे झालेले आहे. त्यातील काही जमिन विकायला ७ वर्षे झाली हि जमिन विकुन दुसरीकडे धावडयाला जमिन खरेदी केली आहे. श्री. पदमसिंग भोपळे यांना पत्नीच्या नावावरील जमिन दिनांक १०/११/२०१४ रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर विकली हा व्यवहार रू. ५८३०००/- मध्ये झाला सदर पैसे इतर लोकांचे देणे देण्यासाठी वापरले आहे.

त्यानंतर सौ. छायाबाइ लक्ष्मण विसपुते यांनी सांगीतले की, नंदलाल भोपळे यांचेकडुन जमिन विकत घेतली किती लक्षात नाही. मात्र सदर जमिनीचे व्यवहार माझे पती श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे सांगण्यावरून व सल्याने झालेले आहे. इतर बाबीची मला माहिती नाही.

ज्याअर्थी संदर्भ क.३ नुसार चौकशी अहवालात नमुद प्रमाणे ,उक्त तक्रारीस अनुसरून उक्त तक्रारीस अनुसरून श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी ता. सिल्लोड यांनी दोन साक्षीदारा समक्ष व माझे समक्ष दिनांक २८/०८/२०१४ रोजी जवाब लिहुन दिलेला आहे.त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, विठ्ठल सुखराम भोपळे हे त्यांचे वडील असुन त्यांना आणखी एक गणेश विठ्ठल भोपळे हा एक भाऊ आहे. तसेच त्यांना जयकोर बाई नावाची बहीनआहे. व त्यांचे एकत्र कुटुंब आहे. त्यांना बहिनीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने सन २००२ मध्ये गावातील सावकार श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन रू. ५००००/- १०% व्याजाने घेतलेली होते. या बदल्यात सदर व्यवहारात आड म्हणुन त्यांनी त्यांचे नावे असलेली तळणी शिवारातील सर्वे नंबर ३५३ मधील १ हेक्टर ६० आर शेतजमिन परत पलटवुन देण्याची तोंडी बोली दोन साक्षदारासमक्ष ठेवुन जमिनीचे खरेदीखत क्र.३०८९ दिनांक १२/०७/२००२ नुसार त्यांचे नावाने करून दिलेले होते. तदनंतर त्यांचे वडीलांचे डोळयाचे दुखण्यासाठी/बरे करण्यासाठी पुन्हा त्यांचेकडुन रू. ३००००/- १०%. दराने घेतले होते. व या रकमेस धर म्हणुन पुन्हा त्यांचे वडीलांचे, भावाचे व बहीनीचे नावावर असलेली गट नं. ३५३ मधील १ हेक्टर ७५ आर व त्यांचे नावावर असलेली १५ आर शेतजमिनीचे खरेदीखत त्यांनी सावकार यांची पत्नी नामे छायाबाई लक्ष्मण विसपुते यांचे नावावर करून दिलेले आहे. सदर दोन्ही जमिनी सावकारी व्यवहारातुन त्यांचे नावाने परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर करून दिलेल्या आहे. जमिनीच्या खरेदीखतावर टाकण्यात आलेली रक्कम शासन दरानुसार टाकलेली आहे. प्रत्यक्ष जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला नाही. सावकारी व्यवहार असल्याने जमिन त्यांचेच ताब्यात होती. व आजही त्यापैकी ४ एकर जमिन त्यांचेच ताब्यात आहे. आतापर्यंत त्यांनी सावकारास रू.१०००००/- परत केलेले

आहे. या रकमेवरील व्याज फिटत नसल्याने पैशाचे व्याज म्हणुन उर्वरीत ५ एकर जमिन त्यांना तात्पुरती कसण्यासाठी दिलेली होती तथापी सदरची ५ एकर जमिन त्यांनी परस्पर विक्री केली आहे. व उर्वरीत जमिन स्वताःहा (ते) कसत आहे. व हा व्यवहार श्री. धर्नसिंग शितलसिंग बेडवाल, बाबुलाल फुलसिंग गोठवाल व भावलाल फुलसिंग गोठवाल रा. चारनेरवाडी यांचे समक्ष झालेला आहे. ह्या जवाबात त्यांनी असेही नमुद केले की, या व्यतीरिक्त त्यांनी सदर सावकाराकडुन सन २००३ मध्ये भावाच्या लग्नासाठी रू. २००००/- १०% व्याजाने घेतले होते. व या बदल्यात वडीलांचे नावावर असलेली गट नं.३४१ मधील ८० आर जमिन त्यांचे नावाने करून दिली होती. या रकमेची मुद्दल व व्याजासह परत फेड झाल्याने या शेतजमिनीची रजिस्ट्री त्यांनी त्यांचे व भाऊजयीचे नावे परत पलटवुन घेतलेली आहे. या जमिनीच्या खरेदीखताची प्रत (खरेदीखत क्र.२१३२ दिनांक २६/०४/२००५)ची झेरॉक्स प्रत त्यांनी जवाबासोबत सादर केलेली आहे. हा व्यवहार त्यांनी सावकारीतुन केलेला आहे, व जमिन परत पलटवुन देणे बाबत तोंडी बोली झालेली आहे. तथापी सावकार ही जमिन विक्री करण्याची धमकी देत आहे. म्हणुन त्यांचेवर कार्यवाहीसाठी त्यांनी जवाब लिहुन दिलेला आहे.

सदर प्रकरणी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी केलेली असुन चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष दिले आहे.या प्रकरणात ज्यांचे विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रार करण्यांत आलेली आहे, ते श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील राहत्या घराच्या दिनांक १४/०८/२०१४ रोजी घेण्यांत आलेल्या घरझडती मध्ये इतर शेतकऱ्यांचे सहया केलेले व न केलेले कोरे धनादेश,-२३ सहया केलेले व न केलेले कोरे बॉन्ड पेपर-१२ व्याजाने कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या नोंदी असलेल्या-७ नोंद वहया, राष्ट्रीय बचतपत्र-१ जनावरांचे दाखले-३५ व शेतकऱ्यांच्या जमिनीची मुळ खरेदीखते -५१ व खरेदीखत कायम-४ इत्यांदी दस्ताऐवज आढळुन आलेले आहेत. तसेच त्यानुसार मा. तहसिलदार सिल्लोड यांनी सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी सत्वर कार्यवाही केली व संबंधीत तलाठी यांना सत्य परीस्थीतीचा पंचनामा सादर करण्याचे सांगीतले व प्राप्त दि.[illegible]/२०१४ चे पंचनाम्यासह त्यांनी त्यांचे पत्र दिनांक १५/९/२०१४ नुसार अहवाल सादर केला आहे. त्यांतील उपरोक्त नमुद १ ते १५ शेतकऱ्या पैकी खालील नमुद १ ते १५ शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा संबंधीत जमिन खरेदीकरून घेणार यांचेकडे नसुन शेतजमिनीचा ताबा हा प्रत्यक्ष जमिनी खरेदी खत करून देणारे शेतकरी यांचेच ताब्यात आहे. त्यामध्ये अर्जदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांचाही समावेश आहे.त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	गावाचे नांव	खरेदी खताचे रेकार्डनुसार खरेदी करणाऱ्याचे नांव	खरेदी खताचे रेकार्डनुसार विक्री करणाऱ्याचे नांव	गट व एकुण क्षेत्र	पैकी प्रत्यक्ष जमिन ताबे दाराचे च कसनाराचे नाव
१	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ईश्वर किसन पैठणे रा. धावडा	गट नं.४० क्षेत्र १ हेक्टर २३ आर	ईश्वर किसन पैठणे रा. धावडा
२	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	एकनाथ रतन गिरी रा. धावडा	गट नं.३२ क्षेत्र ८० आर	एकनाथ रतन गिरी रा. धावडा
३	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	पांडुरंग फकिरा जाधवरा. धावडा	गट नं.३२ क्षेत्र ५ एकर ३० आर	संजय पांडुरंग जाधवरा. धावडा
४	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा	गट नं.७/१ व ७/२ क्षेत्र १ हेक्टर ३० आर	ज्ञानेश्वर वामनराव भांमरे रा. धावडा
५	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा	गट नं.२५ क्षेत्र १ हेक्टर ११ आर	एकनाथ तुकाराम दिवटे रा. धावडा
६	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	नंदु कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ३५ आर	नंदु कचरू दिवटे रा. धावडा

७	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	नंदु कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र १४ आर	नंदु कचरू दिवटे रा. धावडा
८	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा	गट नं.६७ क्षेत्र ९१ १/२ आर	चंद्रकांत कचरू दिवटे रा.धावडा
९	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ३२ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
१०	धावडा	शोभाबाई सोमनाथ वाणी रा. आमठाणा	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६७ क्षेत्र ४२ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
११	धावडा	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा	गट नं.६४/१ क्षेत्र १ हेक्टर १९ आर	यशोदाबाई कचरू दिवटे रा. धावडा
१२	तळणी	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी	गट नं.३५४ क्षेत्र ५३ आर	सांडुसिंग कचरू भोपळे रा. तळणी
१३	**तळणी**	**छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी**	**नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी**	**गट नं.३५३ क्षेत्र १ .हेक्टर ४९ आर**	**नंदलाल विठ्ठल भोपळे रा. तळणी**
१४	तळणी	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	ब्रिजलाल आसाराम बेडवाल रा. तळणी	गट नं.२६६ क्षेत्र १ हेक्टर ४८आर	प्रेमसिंग हिरालाल भोपळे रा. तळणी
१५	शिंन्देफळ	लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ	गट नं.२६५ क्षेत्र ५६ आर	रघुनाथ महादु कावले रा. शिंन्देफळ

उपरोक्त प्रकरणी चौकशी अंती घेतलेले जाब जवाब मा. तहसिलदार यांचे जमिनीचे तावे बाबतचा अहवाल व दिनांक १५/०९/२०१४ रोजी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत सापडलेल्या दस्तऐवजावरून चौकशी अंती ज्यांची खरेदीखते आढळुन आली त्यापैकी २५ शेतकऱ्यांनी व खरेदीखतांवरील साक्षीदारांनी ती खरेदीखते व्याजाने घेतलेल्या रक्कमेस आड म्हणुन करून दिल्याचे त्यांनी चौकशी अधिका-यांना दिलेल्या लेखी जवाबात लिहुन दिलेले आहे.

तसेच पुढील पाच प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडुन कर्ज घेऊन त्यांना जमिनीचे खरेदीखत करून दिले व त्या शेतकऱ्यांनी कर्जाची सव्याज परत फेड केल्या नंतर श्री. विसपुते यांनी त्यांच शेतकऱ्यांना अथवा त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांना त्याच जमिनी पलटवुन देण्या बाबतचे खरेदीखत करून दिलेले असल्याचेही सिध्द झालेले आहे.

तक्ता:-१

अ.क्र	खरेदीखत क्र.व दि.	खरेदीखत करून देणार	व खरेदी खत करून घेणार	खरेदी खत करुन घेणा-याचे परत खरेदी खत खत करून देणा-यासी नाते
१.	२४५६ दि.९/६/०९	श्री.बाबुलाल शंकर बावस्कर रा.धावडा	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	स्वत:
२.	१९६८दि.१९/४/०५	श्री.कचरु संतु भोपळे रा.तळणी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	वडील
३.	१६६० दि.१/४/०५	श्री.दौलत बसी महेर रा.उपळीवाडी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	वडील
४	३९६०दि.२/९/०४	श्री.गणेश विठ्ठल भोपळे रा.तळणी	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा.तळणी	भाऊ
५	३६२८ दि.११/६/०१	श्री.कडुबा बाबुराव वाघ रा.तळणी	श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी	पती

तक्ता:-२

अ.क्र	खरेदीखत क्र.व दि.	खरेदीखत करून देणार	व खरेदी खत करून घेणार	खरेदी खत करु घेणा-याने परत खरेदी खत करुन देणा-यासी नाते
१.	३२९५ दि.१७/६/१४	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.बाबुलाल शंकर बावस्कर	स्वतः
२.	१७१४,दि.१४/५/०८	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.सांडुसिंग कचरूसिंग भोपळे	मुलगा
३.	३५०१ दि.२६/७/१०	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.पोपट दौलत महेर	मुलगा
४	२७३२ दि.२६/४/०५	श्री.लक्ष्मण भिका विसपुते रा. तळणी	श्री.इंदलाल विठ्ठलसिंग भोपळे	भाऊ
५	४१८६ दि.२१/१०/१०	श्रीमती छायाबाई लक्ष्मण विसपुते रा. तळणी	श्रीमती मालताबाई कडुबा वाघ	पती

तसेच सदर तक्रार अर्जात उल्लेख असलेले १) श्री.एकनाथ रतन गिरी रा.धावडा ता.सिल्लोड २) श्री.पांडुरंग फकिरा जाधव रा.धावडा ३) श्री. ज्ञानेश्वर वामन भामरे ४) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ५) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा ६) श्री.सांडु भोपळे रा.तळणी ७) श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळणी ८) श्री.बाबुलाल फुलसिंग रा.चारनेरवाडी हे शेतकरी व त्यांच्या खरेदीखतावरील १) श्री.नंदु कचरू दिवटे रा.धावडा २) ज्ञानेश्वर वामनराव भामरे रा.धावडा साक्षीदारांनी प्रत्येकी रू.१०० च्या बॉन्डवर श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांनी व्याजाने पैसे दिल्या बाबतची शपथपत्रे सादर केलेली आहेत.तसेच सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी मा. तहसिलदार, सिल्लोड यांना दि.२६/८/२०१४ व दि.५/९/२०१४ नुसार केलेल्या विनंती नुसार त्यांनी १) श्री.ईश्वर किसन पैठणे २)श्री.एकनाथ रतन गिरी ३) श्री.पांडुरंग फकिरा जाधव (मयत) ४) श्री.ज्ञानेश्वर वामन भामरे ५) श्री.एकनाथ तूकाराम दिवटे ६) श्री.नंदू कचरू दिवटे तसेच नंदू कचरू दिवटे ७) श्री.चंद्रकांत कचरू दिवटे,यशोदाबाई कचरू दिवटे यांच्या जमिनी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी परस्पर दुस-यांस विकलेल्या जमिनीच्या ताब्याबाबत संबंधीत तलाठयांकडुन करवुन घेतलेल्या पंचनाम्यांनुसार शेतकऱ्यांनी खरेदीखत करून दिलेल्या जमिनींचा ताबा श्री. लक्ष्मण भिका विसपुते यांचेकडे नसुन त्या त्या शेतकऱ्यांकडेच असल्याचे तलाठी यांचा दि.२९/८/२०१४ चा पंचनामा अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामध्ये अर्जदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांचेही सदर शेताचा पंचनामा दि.२८/८/२०१४ नुसार ताबा व पिक पेरा असल्याचे आढळून आले आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST AURANGABAD

उपरोक्त बाबींवरून वरून श्री. लक्ष्मण भिका विसपुते, रा. तळणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद हे बेकायदेशीर रित्या सावकारी करीत असल्याचे चौकशी अंती स्पष्ट दिसुन येते.त्याबाबत गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिकाजी विसपुते यांना चौकशी अधिकारी यांनी म्हणणे मांडण्याची संधी दिलेली आहे. त्यांनी चौकशी अधिकारी यांचेसमोर दि.२८/८/२०१४ रोजी तसेच सुनावणीमध्ये या कार्यालयानेही दि.१७/१०/२०१४ व दि.२/१२/२०१४ रोजी नोटीस देवून त्यांचे सदर व्यवहाराबाबत म्हणणे मांडण्याची १७/११/२०१४,दि.२/१२/२०१४, दि.२२/१२/२०१४ व ३१/१२/२०१४ चे सुनावणीमध्ये संधी दिलेली आहे.

अर्जदार, श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे रा.तळणी ता.सिल्लोड यांनी तक्रारीत नमुद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांचा इत्यंभूत चौकशी अंती सादर केलेला दि.२५/९/२०१४ रोजीचा चौकशी अहवालातील निष्कर्ष गैरअर्जदाराच्या वतीने सादर केलेला खुलासा व या कार्यालयातील सुनावणी दिनांक १७/११/२०१४, दि. २/१२/२०१४, दि.२२/१२/२०१४ आणि ३१/१२/२०१४ रोजीचे सुनावणी दरम्यान मांडलेले तोंडी व लेखी म्हणणे,अर्जदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांचा १ हे. ४९ , आर जमीनीचा अर्जदाराचा प्रत्यक्ष ताबा विचारात घेता पुढील बाबी निदर्शनास येतात.

१) गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे तळणी येथे दि.१४/८/२०१४ रोजी घेतलेल्या घरझडती मध्ये सापडलेले आक्षेपार्ह दस्तऐवज जसे (१) कोरे सहया असलेले बॉन्ड -१२ (२) कोरे धनादेश -२३ (३) बँक पासबुक -६ (४) राष्ट्रीय बचतपत्र-१ (५) नोंदणी व सुट्टे कागद-१९ (६) नोंदवहया -७ (७) जनावराचे दाखले-३८ (८) खरेदी खत-५१ (९) उसनवार पावती-४ (१०) खरेदीखत कायम-४ इ.कागदपत्र तसेच उपरोक्त जमीन खरेदी विक्री व्यवहारापैकी गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांनी खरेदी केलेल्या जमिनी ५ परत त्याच व्यक्तींना पुन्हा सदर जमीन परत करणे यावरुन सदरचे खरेदी व्यवहार सावकारी संदर्भाने सदर जमीन खरेदीखत प्रतिभुती होती हे तक्रारदाराचे म्हणण्यास पुष्ठी देणारे आहेत.

सबब अर्जदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांनी स्वतःच्या नावावरील तळणी शिवारातील गट नं.३५३ मधील १ हे.६० आर, व १५ आर जमिन तसेच त्यांचे वडील विठ्ठल सुखराम भोपळे यांच्या नावावरील १ हे.७५ आर जमिन अशी एकूण ३ हेक्टर ५० आर जमिन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते यांचे व त्यांच्या पत्नी सौ.छायाबाई यांचे नावांवर एकूण ३ खरेदीखताद्वारे करून दिलेली आहे. श्री. विसपूते यांनी त्या पैकी प्रत्येकी ८० आर शेतजमिन श्री. प्रभाकर भगवंतराव ठौबरे यांना व सौ. रेखाबाई कैलास भोपळे यांना विक्री केलेली आहे. श्री. प्रभाकर भगवंतराव ठोबरे यांनी श्री. विसपुते यांचेकडुन घेतलेली ८० आर शेतजमिन त्यानंतर श्री. विजय आनंदा ठोबरे यांना विक्री केलेले आहे. तसेच त्यानंतर सौ. छायाबाई यांचे नावावरील ४१ आर शेतजमिन सौ. मिराबाई कपुरचंद भोपळे यांना विक्री केली आहे. उर्वरीत १ हेक्टर ४९ आर या जमिनीचा ताबा अर्जदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांचेकडेच असल्याचे तलाठी पंचनाम्यान्वये आढळुन आलेले आहे. त्या नंतर श्री. विसपुते यांनी पुन्हा सौ. छायाबाई यांच्या नावावरील १ हेक्टर ४९ आर जमिन गुन्हा दाखल झाल्यानंतर दिनांक १०/११/२०१४ रोजी पदमसिंग शिवलाल भोपळे यांना परस्पर विक्री केलेली आहे. वरील सर्व खरेदीखतांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	खरेदीखत क्र.व दि.	खरेदीखत करून देणार	खरेदी खत करून घेणार	मौ.तळणी गट नं. ३५३ मधील क्षेत्र
१.	३०८९/२००२ दि.१२/०७/२००२	नंदलाल विठ्ठल भोपळे	लक्ष्मण भिकाजी विसपुते	१ हेक्टर ६० आर
२.	३६९५/२००३ दि.०३/१०/२००३	नंदलाल विठ्ठल भोपळे	छायाबाई लक्ष्मण विसपुते	१५आर
३.	३६९६/२००३ दि.०३/१०/२००३	विठ्ठल सुखराम भोपळे	छायाबाई लक्ष्मण विसपुते	१ हेक्टर ७५ आर
४	३०५४/२००३ दि.०५/०७/२००३	लक्ष्मण भिकाजी विसपुते	प्रभाकर भगवंतराव ठोबरे	८० आर
५	१७१५/२००८ दि.१४/०५/२००८	छायाबाई लक्ष्मण विसपुते.	मिराबाई कपुरचंद भोपळे	४१ आर
६	१७१३/२००८ दि.१४/०५/२००८	लक्ष्मण भिकाजी विसपुते	रेखाबाई कैलास भोपळे	८० आर
७	२९७६/२०१२ दि.१३/०७/२०१२	प्रभाकर भगवंतराव ठोबरे	विजय आनंदा ठोबरे	८० आर
८	५०२८/२०१४ दि.१०/११/२०१४	छायाबाई लक्ष्मण विसपुते	पदमसिंग शिवलाल भोपळे	१ हेक्टर ४९ आर

वरील सर्व जमीन मुळ विक्रीदार श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे व त्यांचे वडील विठ्ठल सुखराम भोपळे यांनी सावकारी पोटी गहाण ठेवलेली आहे. म्हणून सदर खरेदीखत अवैध ठरवुन ती जमीन त्यांच्या नावाने परत करणे ही बाब वरील जमिनीपैकी १ हेक्टर ४९ आर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदाराकडे असल्यामुळे अर्जदाराचे बाजुने आहे. श्री. नंदलाल विठ्ठल भोपळे व त्यांचे वडील श्री. विठ्ठल सुखराम भोपळे यांनी श्री. विसपुते व त्यांची पत्नी सौ. छायाबाई यांना ३ खरेदीखतांद्वारे एकूण ३ हेक्टर ५० आर जमिन लिहुन दिली होती. श्री. विसपुते यांच्यावर गुन्हा दाखल होण्यापुर्वी त्यांनी त्या पैकी २ हेक्टर १ आर जमिन एकूण ३ खरेदीखतांद्वारे श्री. प्रभाकर भगवंतराव ठोबरे, सौ. रेखाबाई कैलास भोपळे व सौ. मिराबाई कपुरचंद भोपळे यांना विक्री केलेली आहे. उर्वरीत सौ.छायाबाई हिचे नावावरील १ हेक्टर ४९ आर जमिन श्री. विसपुते यांनी त्यांचे वर गुन्हा दाखल झाल्यानंतर श्री. पदमसिंग शिवलाल भोपळे यांना विक्री केलेली आहे. दरम्यान श्री. विसपुते यांनी प्रभाकर भगवंतराव ठोबरे यांना विकलेली ८० आर जमिन श्री. ठोबरे यांनी श्री. विजय आनंदा ठोबरे यांना विक्री केलेली आहे. सदर मुळ ३ हेक्टर ५० आर जमिन गैरअर्जदार यांनी सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन करून घेतली असल्याची माझी खात्री झाली आहे. म्हणुन सदर जमीनीची मुळ तिन व त्यानंतरची पाच अशी सर्व आठ खरेदीखते अवैध असल्याचे जाहीर करुन ती जमिन अर्जदार मुळ मालक श्री. विठ्ठल सुखराम भोपळे व श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांना परत करणे करीता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

मी, एन.व्ही.आघाव, सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद ; महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन गैरअर्जदार श्री.लक्ष्मण भिका विसपुते व त्यांची पत्नी सौ.छायाबाई लक्ष्मण विसपुते रा.तळणी, ता.सिल्लोड यांना सावकारीच्या ओघात

करून [illegible] केलेले शेतजमिनीचे खालील नमुद सर्व आठ खरेदीखते अवैध असल्याचे घोषीत करीत [illegible]

[illegible]	[illegible]	खरेदीखत करून देणार	खरेदी खत करून घेणार	मौ.तळणी गट नं. ३१३ मधील क्षेत्र
[illegible]	[illegible] दि.१२/०७/२००२	नंदलाल विठ्ठल भोपळे	लक्ष्मण भिकाजी विसपुते	१ हेक्टर ६० आर
[illegible]	[illegible] २००३ दि.०३/१०/२००३	नंदलाल विठ्ठल भोपळे	छायाबाई लक्ष्मण विसपुते	१५आर
[illegible]	[illegible] २००३ दि.०३/१०/२००३	विठ्ठल सुखराम भोपळे	छायाबाई लक्ष्मण विसपुते	१ हेक्टर ७५ आर
[illegible]	३०५४/२००३ दि.०५/०७/२००३	लक्ष्मण भिकाजी विसपुते	प्रभाकर भगवंतराव ठोबरे	८० आर
[illegible]	१७१५/२००८ दि.१४/०५/२००८	छायाबाई लक्ष्मण विसपुते	मिराबाई कपुरचंद भोपळे	४१ आर
६	१७१३/२००८ दि.१४/०५/२००८	लक्ष्मण भिकाजी विसपुते	रेखाबाई कैलास भोपळे	८० आर
७	२९७६/२०१२ दि.१३/०७/२०१२	प्रभाकर भगवंतराव ठोबरे	विजय आनंदा ठोबरे	८० आर
८	५०२८/२०१४ दि.१०/११/२०१४	छायाबाई लक्ष्मण विसपुते	पदमसिंग शिवलाल भोपळे	१ हेक्टर ४९ आर

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) अन्वये अवैध असल्याचे घोषित करण्यात येत आहे आणि सदर खरेदीखतामधील जमीन अर्जदार हस्तांतरणकार मुळ मालक श्री. विठ्ठल सुखराम भोपळे व श्री.नंदलाल विठ्ठल भोपळे यांना ताब्यासह परत करण्यात येत आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार, संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणींतर्गत सदर जमीनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक१५/०४/२०१५ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)
सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

C/C

प्रत -

१.मा.उप विभागीय अधिकारी सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२.मा.तहसिलदार सिल्लोड यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्त देण्यात येते.
३.तलाठी सजा शिंदेफळ ता.सिल्लोड यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था, सिल्लोड यांना त्यांचा चौकशी अहवाल दि.२५/९/२०१४ च्या संदर्भात

प्रत माहितीस्तव सविनय सादर.-

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक ,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंध
सहकारी संस्था औरंगाबाद

C/C